॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

25 1994 - 2019 SILVER JUBILEE YEAR


## ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION


Phone: (02462) 229542
Fax : (02462) 229574

Website: www.srtmun.ac.in

E-mail: bos.srtmun@gmail.com


शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता कॅरिऑन अंतर्गत शैक्षणिक सत्र पूर्ण करण्यासाठी तात्पुरता प्रवेश देण्याबाबत.

# प रि प त्र क

या परिपत्रकान्वये प्रस्तुत विद्यापीठाशी पूर्वी संलग्नित असलेली अभियांत्रिकी महाविद्यालये, जे की सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नीकल युनीव्हर्सिटी, लोणेरे (बाटू) या विद्यापीठाशी संलग्नित आहेत, त्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना कॅरिऑन अंतर्गत शैक्षणिक सत्र पूर्ण करण्यासाठी तात्पुरता प्रवेश देण्याचा निर्णय झालेला असून, त्याची नियमावली खालीलप्रमाणे असेल.

१) अभियांत्रिकी प्रथम वर्षापासून ते तृतीय वर्षापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्गात तात्पुरता प्रवेश देण्यात यावा. मात्र, या विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात प्रवेश घेण्यापूर्वी मागील वर्गातील टर्म समाधानकारकपणे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. Detained विद्यार्थ्यांना कॅरिऑन अतर्गत पुढील वर्गात प्रवेश देण्यात येणार नाही.

मात्र उपरोक्तप्रमाणे कॅरिऑन अंतर्गत पुढील वर्गात तात्पुरता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेशासाठी आवश्यक अर्हता प्राप्त केल्याशिवाय परीक्षेस बसता येणार नाही. उदा. प्रथम वर्ष ए.टी.के.टी. किंवा उत्तीर्ण झाल्याशिवाय द्वितीय वर्षाची परीक्षा देता येणार नाही. तसेच प्रथम वर्ष पूर्ण उत्तीर्ण व द्वितीय वर्ष उत्तीर्ण/ए.टी.के.टी झाल्याशिवाय तृतीय वर्षाची परीक्षा देता येणार नाही. द्वितीय वर्ष उत्तीर्ण व तृतीय वर्ष उत्तीर्ण/ए.टी.के.टी. झाल्याशिवाय बी.ई. (अंतिम) ची परीक्षा देता येणार नाही.

परीक्षेचे प्रचलित नियम, उत्तीर्णतेचे निकष पूर्ण केल्याशिवाय पुढील वर्गाची परीक्षा देता येणार नाही.

२) अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना उन्हाळी–२०१९ परीक्षेसाठी प्रती सेमीस्टर ३ विषय पुनर्मूल्यांकन करण्याची संधी देण्यात येईल.

३) कॅरिऑन अंतर्गत विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश घेण्यापूर्वी परीक्षेच्या सर्व प्रचलित नियमांची पूर्तता केल्यानंतरच परीक्षा देता येईल. तसेच समाजकल्याण विभागाकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्ती संदर्भात विद्यापीठाची जबाबदारी राहणार नाही. ती सर्व जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची असेल, असे हमीपत्र विद्यार्थ्यांकडून घेण्यात घ्यावे.

४) कॅरिऑन अंतर्गत तात्पुरता प्रवेश घेण्यासाठी दिनांक २०.०९.२०१९ ही अंतिम तारीख असेल, त्यानंतर प्रवेश घेता येणार नाही. अशा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची वर्गनिहाय, अभ्यासक्रमनिहाय यादी महाविद्यालयांनी विद्यापीठात (परीक्षा विभागात) दिनांक २५.०९.२०१९ पर्यंत सादर करावी.

५) कॅरिऑन अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे टेस्ट/टर्मवर्कचे गुण महाविद्यालयांनी त्यांच्याकडे ठेवावेत व तो विद्यार्थी पुढील वर्गात परीक्षा देण्यास पात्र झाल्यावर ते गुण विद्यापीठात (परीक्षा विभागात) सादर करावेत.

६) तात्पुरता प्रवेश घेऊन पुढील वर्गाच्या परीक्षेस पात्र विद्यार्थी केवळ उन्हाळी परीक्षेतच दोन्ही सत्रांची परीक्षा एकत्रितपणे देतील.

७) कॅरिऑन अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना हिवाळी–२०१९ व उन्हाळी–२०१९ परीक्षेत थेअरीमध्ये ३२ किंवा त्यापेक्षा जास्त गुण असून, एकूण गुण ४० पेक्षा कमी गुण असल्यामुळे अनुत्तीर्ण होत असेल, तर त्याची संबंधित विषयांची Improvement Test घेण्यात येईल. ही परीक्षा निकाल जाहीर झाल्यानंतर पंधरा दिवसात (उन्हाळी परीक्षेच्या) घेण्यात यावी; परंतु सदर सुविधा CGPA Pattern च्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. तसेच पुनर्मूल्यांकनानंतर ३२ किंवा जास्त गुण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

सदरील परिपत्रक प्रस्तुत विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६.
**जा.क्र.:** शैक्षणिक–१/परिपत्रक/अभियांत्रिकी–कॅरिऑन/२०१९–२०/**११५९**
**दिनांक** : ३१.०८.२०१९.

स्वाक्षरित/–
**उपकुलसचिव**
शैक्षणिक (१–अभ्यासमंडळ) विभाग

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :

१) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालय प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. प्राचार्य, सर्व संबंधित डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नीकल युनीव्हर्सिटी, लोणेरे (बाटू) या विद्यापीठाशी संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४) उपकुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
५) साहाय्यक कुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६) सीनीअर प्रोग्रामर, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.